दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८५ वा रविवार दि.०१ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## पुण्यातल्या विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी पंकजा मुंडेंकडे

पुणे : विधानसभा निवडणुकीची तयारी भाजपने सुरु केली असून पुणे लोकसभा मतदारसंघात येणा-या सहा विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि आमदार पंकजा मुंडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. विधानसभेच्या पदाधिका-यांची बैठक घेऊन पुण्यात काय होणार याचा अहवाल प्रदेश भाजपकडे सादर करणार आहेत.

लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे राज्यात मोठे नुकसान झाले आहे. खासदारांची संख्या २३ वरून ९ वर आली आहे. भाजपचे आमदार असणा-या अनेक विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना लोकसभेत चांगले मताधिक्य मिळाल्याने आमदारांसह नेत्यांचीही चिंता वाढली आहे.

भाजपच्या प्रदेश अधिवेशनात विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात भाजपच्या नेतृत्वाखाली महायुतीची सत्ता स्थापन होईल असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला आहे. पण त्यासाठी जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचे आव्हान भाजपपुढे आहे. यासाठी संघटनात्मक पातळीवर भाजपने काम सुरु केले आहे. यासाठी भाजपने प्रत्येक लोकसभा मतदारसंघात दोन नेत्यांची नियुक्ती करून त्यांच्याकडे प्रत्येकी तीन मतदारसंघाची जबाबदारी दिली आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे कसबा, पर्वती आणि पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभेची जबाबदारी दिली आहे. तर पंकजा मुंडे यांच्याकडे शिवाजीनगर, वडगाव शेरी, कोथरूड या मतदारसंघाची जबाबदारी दिली आहे. तर बारामतीमधील खडकवासला विधानसभा मतदारसंघही मुंडे यांच्याकडे देण्यात आला आहे. मोहोळ यांनी कसबा आणि पर्वती विधानसभा मतदारसंघाची बैठक घेतली आहे. तर मुंडे यांच्या बैठका पुढील काही दिवसात होणार आहेत.



या बैठकांमध्ये भाजपची बुथनिहाय स्थिती काय आहे?, लोकसभा निवडणुकीत कोणत्या बुथवर किती मताधिक्य मिळाले, कुठे पिछाडी होती, त्यामागची कारणे काय आहेत याचा आढावा घेण्यात आला. तसेच स्थानिक पदाधिका-यांचे म्हणणे काय आहे हे जाणून घेऊन त्याचा अहवाल प्रदेश भाजपकडे सादर करणे अपेक्षित आहे. त्यावरून विधानसभा निवडणुकीची रणनीती आखली जाणार आहे. दरम्यान मोहोळ यांनी घेतलेल्या बैठकीत कसबा आणि पर्वतीमध्ये जे मताधिक्य मिळाले त्यावर विसंबून राहू नका, आपण हवेत राहिल्यास त्याचा फटाका बसू शकतो. आतापासूनच सतर्क रहा, व्यवस्थित नियोजन करा लोकसभा निवडणुकीत आपली ऐनवेळी पळापळ झाली होती अशा शब्दात कान टोचल्याचे भाजपमधील काही पदाधिका-यांनी सांगितले.

प्रदेश भाजपने पुणे लोकसभेतील मतदारसंघाची जबाबदारी मुरलीधर मोहोळ आणि पंकजा मुंडे यांच्याकडे दिली आहे. त्यानुसार मोहोळ यांनी कसबा व पर्वती या दोन मतदारसंघाची बैठक घेतली आहे. या दोन्ही नेत्यांचे प्रवास पुढील काही दिवसात पूर्ण होतील.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर :- राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे रविवार, १ सप्टेंबर, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे १ सप्टेंबर रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर रेल्वे स्टेशन येथे आगमन होईल व मोटारीने शकुंतला निवासस्थानकडे प्रयाण करतील. सकाळी १० वाजता लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता उदगीर शहरातील नळेगाव रोडवरील ललित मंगल भवन येथील स्वा. सै. मन्मथअप्पपा चिल्ले शताब्दी आयोजन समिती व आर्य समाज करडखेलच्यावतीने स्वा. सै. मन्मथअप्पा भद्रअप्पा चिल्ले (पू. आनंदमुनिजी) यांच्या गौरव शताब्दी समारंभास उपस्थिती. सकाळी ११.४० वाजता उदगीर शहरातील कौळखेड रोडवरील वसंतराव नाईक चौक येथे आनंद व्यसनमुक्ती केंद्राच्या उद्घाटन सोहळ्यास ते उपस्थिती. दुपारी १२ वाजता उदगीर शहरातील कौळखेड रोडवरील शिवम फंक्शन हॉल येथे महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या ४ सप्टेंबर, २०२४ च्या उदगीर दौरा अनुषंगाने सर्व पत्रकार बांधवांशी संवाद व बैठकीस उपस्थित राहतील. सायंकाळी ४ वाजता उदगीर येथे राखीव. त्यानंतर सोईनुसार उदगीर येथून मोटारीने लातूरकडे प्रयाण करतील.

## समाजातील वंचित घटकांना न्याय देण्यासाठीच वंचित बहुजन आघाडीत प्रवेशाचा निर्णय : विनोद खटके




लातूर : समाजातील सर्व वंचित घटकांना सर्वांगीण न्याय देण्याच्या उद्देशानेच आपण सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती व्हि.एस. पँथर्स सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना दिली. मागच्या अनेक वर्षात लातूरच्या सामाजिक क्षेत्रातील सर्वात मोठे संघटन, अशी ओळख व्हि. एस. पँथर्सने निर्माण केली आहे. आपल्या व्हि.एस. पँथर्सच्या माध्यमातून आतापर्यंत पाच सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळे, अनेक रक्तदान शिबिरांचे आयोजन, स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर, शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत हजारो विद्यार्थ्यांना शाळा - महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्याबरोबरच विविध सामाजिक - राजकीय प्रश्नांवर मोर्चे- धरणे आंदोलने, रास्ता रोको आंदोलने केली असून नुकत्याच पार पडलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हयात ३०० शाखा व एक लाख तरूणांची सदस्य नोंदणी मोहिम राबवली असल्याचे विनोद खटके यांनी सांगितले.

व्हि. एस. पँथर्स संघटनेच्या स्थापनेपासून राजर्षी शाहु - महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पुरोगामी विचारसरणीवर सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करण्याचे काम केले आहे. यापुढील काळातही याच विचारसरणीवर आपण मार्गोत्क्रमण करणार आहोत, असे सांगून विनोद खटके पुढे म्हणाले की, आतापर्यंत केलेल्या सामाजिक कार्याच्या बळावर समाजातील तळागाळातील वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आणि पुरोगामी विचारांची मुहुर्तमेढ रोवण्यासाठी दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी वंचित बहुजन आघाडीत आघाडीचे संस्थापक - अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत आपल्या असंख्य समर्थकांसह प्रवेश करत आहोत. या प्रवेशासाठी आघाडीच्या नेत्यांकडे आपण कोणत्याही प्रकारची अपेक्षा ठेवलेली नाही की कसली मागणी केलेली नाही. आघाडीचे संस्थापक अ‍ॅड. आंबेडकर जो आदेश देतील त्याप्रमाणेच आपण काम करणार आहोत. लातूरमध्ये सोमवारी होणाऱ्या पक्षप्रवेश सोहळा व महामेळाव्यात तेच आपल्या विषयीची भूमिका मांडतील असेही विनोद खटके यांनी सांगितले. आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे. त्यामुळे अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशाप्रमाणे आपण व आपले सर्व सहकारी कार्यरत राहू. आपल्यासमवेत व्हि. एस. पँथर्सचे सर्व पदाधिकारी - कार्यकर्ते वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करणार असल्याचे विनोद खटके यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे केवळ आगामी विधानसभा निवडणूकच नव्हे तर यापुढील काळात होणाऱ्या सर्व निवडणूकांमध्ये आपण अ‍ॅड. आंबेडकर यांच्या आदेशानुसार काम करणार असल्याचेही विनोद खटके यांनी सांगितले. याप्रसंगी सचिन मस्के, अमोल सुरवसे,किरण पायाळ, प्रतिक कांबळे, आनंद जाधव, विकार अलताब देशमुख, असदभाई शेख, राहुल कांबळे, किरण केंद्रे यासीनभाई शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी श्री काशी विश्वेश्वर मंदिर येथील संगीतमय शिवकथा व परम रहस्य पारायण सोहळ्यास उपस्थित राहून केली महाआरती



लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी लातूर शहरातील विशाल नगर येथील श्री काशी विश्वेश्वर मंदिर येथील संगीतमय शिवकथा व परम रहस्य पारायण सोहळ्यास उपस्थित राहून महाआरती केली. श्री काशी विश्वेश्वर मंदीर येथे श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे शिवकथा व परमरहस्य पारायण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या सोहळयास भेट दिली. शिवकथा ऐकली आणि श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वराध्य शिवाचार्य महास्वामीजी ज्ञानपीठ काशी व शिवकथाकार अमृतेश्वर शिवाचार्य महाराज व डॉ. शांतवीरलींग शिवाचार्य महाराज यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी महापौर दिपक सूळ, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, ड. गंगाधरप्पा हामणे, बसवंतअप्पा भरडे, भालचंद्रप्पा मानकरी, बिराजदार, पंचाक्षरी, जितेंद्र स्वामी आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते



## महिला बचत गटाच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी प्रयत्न करणार- आ. कराड







लातूर :- केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने महिला सशक्तीकरणासाठी अनेक योजना सुरू केल्या असून महिलांनी गावागावात बचत गटाची स्थापना केली म्हणूनच बाहेरचे जग पाहता आले. यातून महिलांची एकजूट पाहता आली. प्रत्येक बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी छोटे मोठे उद्योग सुरू करावे. महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करीन अशी ग्वाही देऊन बचत गटाच्या माध्यमातून दर्जेदार आणि चांगली उत्पादने झाली तर बाजारपेठ उपलब्ध होण्यास अडचणी येत नाहीत असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र रेणापुर या संस्थेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रेणापूर येथील श्री बालाजी मंदिर सभागृहात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी जिल्हा समन्वय अधिकारी एम. एस. पटेल, जिल्हा ग्राम उद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे, भाजपा विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, सावित्रीबाई फुले साधन केंद्राच्या अध्यक्षा सरस्वती पवार, उपाध्यक्षा अनुसया फड, व्यवस्थापक उषा डुमणे त्याचबरोबर श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, उज्वल कांबळे, श्रीमंत नागरगोजे, अंतराम चव्हाण, शहराध्यक्ष अच्युत कातळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या वार्षिक सर्वसाधारण सभेत साधन केंद्राअंतर्गत येणाऱ्या सभासद बचत गटाच्या असंख्य महिला आवर्जून उपस्थित होत्या.

देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांनी सर्वसामान्य गोरगरीब तळागाळातील माणसांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी अनेक योजना सुरू केल्या. राज्यातील महायुती शासनाने लाडकी बहीण योजना, बस प्रवासात सवलत यासह महिलांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. घेतलेल्या कर्जाची परतफेड शंभर टक्के महिला बचत गट करतात. या बचत गटाच्या पाठीशी सक्षमपणे उभे राहून सर्व प्रकारची मदत करू असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंना उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर निश्चितपणे प्रयत्न केले जातील. कार्यक्षम आणि होतकरू महिला बचत गटांना शासनाच्या माध्यमातून स्वतंत्रपणे पॅकेज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही यावेळी दिली.

आज महिला कुठेच मागे नाहीत विविध क्षेत्रात मोठी झेप घेतली असून पुरुषाच्या बरोबरीने किंबहुना त्यांच्या पुढे जाऊन काम करीत आहेत राज्यातील महायुती शासनाने महिलांसाठी अनेक योजना जाहीर करून महिलांना सन्मान देण्याचे काम केले आहे. बचत गटाच्या महिलांना उद्योग व्यवसायासाठी प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाची गरज असून महिलांनी आपले प्रश्न आणि अडीअडचणी माझ्यापर्यंत दिल्यास त्याची सोडवणूक केली जाईल असा शब्द उपस्थित महिलांना यावेळी बोलताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिला.

लाडकी बहीण योजनेचे पैसे महिलांच्या बॅक खात्यात जमा झाल्याने आ. रमेशअप्पा कराड यांना राखी बांधून अनेक महिलांनी राज्यातील महायुती शासनाचे आभार व्यक्त केले. या सर्वसाधारण सभेस सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र रेणापूर यांच्या अंतर्गत ४६५ महिला बचत गट असून या बचत गटा अंतर्गत ५४३५ महिला जोडल्या गेल्या आहेत. आजच्या या वार्षिक सर्वसाधारण सभेत हजारोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# अब द्रौपदी प्रश्न न पूछेगी

छत्रपतींचा पुतळा पडणे असो वा महिला अत्याचार असो; राज्ये आणि पक्षही वाटेल ते असोत, आपण या गंभीर मुद्द्यांस राजकीय स्वरूप दिल्याखेरीज राहूच शकत नाही चला, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू एकदाच्या बोलल्या. राष्ट्रपतींचे एरवी औपचारिक बोलणे हे मंत्रिमंडळाने मंजूर केलेले असते. पण आता त्या जे काही बोलल्या, ते त्या बोललेल्या नाहीत, त्यांनी लिहिले. आपल्या स्वतंत्र प्रज्ञेच्या आधारे त्यांनी 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया' या वृत्तसंस्थेसाठी लेख लिहिला. त्यामुळे गेल्या कित्येक दिवसांनंतर या देशातील माता, भगिनी आणि कन्या यांच्या चेहऱ्यावर हास्य नाही; पण निदान समाधानाची हलकीशी रेषा तरी उमटली असेल. अलीकडे स्वतंत्र प्रज्ञाधारी लोक 'एएनआय' या वृत्तसंस्थेस खास मुलाखती देतात. अलीकडच्या भारतीय पत्रकारितेत या संस्थेचे स्थान बिनीचे. कधी कधी तर एखादी घटना घडायच्या आधीच 'एएनआय' या वृत्तसंस्थेस तिची खबरबात लागलेली असते आणि त्यांचे वृत्तछायाचित्रकार मोक्याच्या ठिकाणी दबा धरून बसलेले असतात. (पाहा आणि अजितदादा पवार यांचा पहाटेचा शपथविधी. हे दोघे, राज्यपाल आणि 'एएनआय' या तिघांनाच त्याची माहिती होती असे म्हणतात. काहींच्या मते या तिघांच्याही आधीच 'एएनआय' हे जाणून होता. असो) असे असताना महामहिमा द्रौपदी मुर्मू यांनी 'पीटीआय'ची निवड कशी काय केली कोण जाणे! असो. पण कोणत्या वृत्तसंस्थेशी त्यांनी संवाद साधला हे महत्त्वाचे नाही. महत्त्व आहे ते महामहिमा काय म्हणाल्या, यास. ''आता पुरे झाले महिला अत्याचारांविरोधात जागृत व्हा'', असे जाज्वल्य शब्द महामहिमांच्या तोंडून निघाले. समस्त नारीशक्तीविरोधात देशात जे काही सुरू आहे त्या वेदनेचा हुंकारच तो! त्यामुळे समग्र भारतवर्ष दचकले. त्यामागेही महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे साक्षात महामहिमांनीच देशात जे काही सुरू आहे त्याची दखल घेतली. द्रौपदीबाई २०२२ सालच्या जुलै महिन्यात महामहिमा झाल्या. पुढच्याच वर्षी जानेवारी महिन्यात राजधानी दिल्लीत महिला कुस्तीगिरांनी लैंगिक शोषणाविरोधात आंदोलन छेडले. हे आंदोलन बराच काळ रेंगाळले. पण दिल्लीतच वास्तव्यास असल्यामुळे महामहिमांना ते दिसले नसावे बहुधा. दिल्लीतूनच काय; पण अन्य ठिकाणांहूनही पायाखालच्यापेक्षा लांबचे आधी दिसते. त्यामुळे पश्चिम बंगालातील महिला अत्याचारांचे प्रकरण महामहिमांस आधी लक्षात आले. खरे तर मणिपूर हे राज्य तर पश्चिम बंगालपेक्षाही दूर. पण त्या राज्यांतील वांशिक आंदोलनांत महिलांची जी काही अमानुष होरपळ झाली, ती महामहिमांस उद्वेग व्यक्ततेसाठी पुरेशी कशी काय वाटली नाही, हा प्रश्नच. महामहिमाही पूर्वेकडच्या राज्याच्या. पण तरी मणिपुरी महिलांबाबत त्यांनी कधी चकार शब्द काढल्याचे दिसले नाही. इतकेच नाही, तर द्रौपदीबाई महामहिमा झाल्या त्याच वर्षी महिलाविरोधी गुन्ह्यांची देशभरात जवळपास साडेचार लाख प्रकरणे नोंदवली गेली. गृह खात्याच्या आधारे विविध ठिकाणी हा तपशील प्रसृत झालेला आहे. 'राष्ट्रीय गुन्हे नोंदणी यंत्रणे'नुसार त्या वर्षात दिवसाला सरासरी ९० बलात्काराचे गुन्हे आपल्या देशात नोंदले गेले. तथापि ''आता पुरे झाले'' असा त्रागा करण्यासाठी महमहिमांस कोलकात्यात असे काही होईपर्यंत थांबावे लागले. पण विलंबाने का असेना अखेर त्या व्यक्त झाल्या हे महत्त्वाचे. कोलकात्यात झाले ते भयानक होते आणि त्यानंतर त्या राज्य सरकारकडून हे प्रकरण हाताळताना जे सुरू आहे ते त्याहून भयानक आहे. वास्तविक त्या राज्याच्या मुख्यमंत्रीपदी महिला असताना महिलांवरील अत्याचारांबाबत तेथील प्रशासनाची दिरंगाई मानवतेस काळिमा फासणारीच म्हणायची. महामहिमांच्या आधी कायदा-सुव्यवस्था आणि महिलांप्रति आदरभाव बाळगणाऱ्या दस्तुरखुद्द पंतप्रधानांनीही पश्चिम बंगालातील गंभीर परिस्थितीवर भाष्य केले होते. सरकारी राजशिष्टाचारात राष्ट्रपती हे पद पंतप्रधानांपेक्षा मानाचे असते. त्यामुळे कोलकाता घटनेवर व्यक्त होण्यासाठी महामहिमांस पंतप्रधान काय म्हणतात याची वाट पाहण्याची गरज नव्हती. त्यासाठी त्या थांबल्या असे म्हणणे त्यामुळे अयोग्य ठरेल. पंतप्रधानांनी कोलकाताप्रकरणी तीव्र भावना व्यक्त केल्यानंतर महामहिमा व्यक्त झाल्या, हा केवळ तसा योगायोगच. त्याकडे दुर्लक्ष करून या निमित्ताने अनेकांकडून व्यक्त केलेल्या भावनांवर भाष्य करायला हवे. या सर्व भावनांतील समान दुवा म्हणजे जे झाले त्याचे 'राजकारण नको' अशी राजकीय पक्षांची मागणी. तीकडे कसे पाहावयाचे हा प्रश्नच. कारण हे राजकीय पक्ष एका राज्यात सत्ताधीश असतात, तर अन्य कोठे विरोधात. त्यामुळे एखाद्या विषयाचे राजकारण करावयाचे किंवा काय हे एखादा पक्ष विरोधात आहे की सत्तेत यावर अवलंबून असते. जसे की महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा किरकोळ वाऱ्याने उखडला गेला त्याचे राजकारण करू नका, असे भाजप म्हणतो तर हाच भाजप कोलकात्यात झालेल्या घटनेविरोधात राजकीय आंदोलन छेडतो. खरे तर 'आम्हास राजकारण करावयाचे नाही', 'आम्ही राजकारण करू इच्छित नाही' अशा भावनांपासून 'आपणास राजकारणातले काही कळत नाही ब्वा' अशा स्वघोषित कबुलीइतके असत्य जगाच्या पाठीवर अन्य कोणते नसेल. तरीही हा असत्यालाप पिढ्यानपिढ्या, वर्षानुवर्षे असाच सुरू आहे आणि अशा 'बिगरराजकीय' प्रकरणावर महामहिमांनी केली तशी निवडक निवेदनेही वर्षानुवर्षे सुरू आहेत. महाराष्ट्रात पुतळा पडला म्हणून विरोधी पक्षीय राष्ट्रवादी-काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आंदोलन छेडले तर पश्चिम बंगालात ही जबाबदारी विरोधी पक्षीय भाजपने पार पाडली. त्या पक्षाने त्या राज्याच्या लौकिकानुसार एकदम बंद पुकारला आणि त्या वेळच्या मोर्चात सत्ताधारी तृणमूल आणि विरोधी भाजप यांच्यात गुद्दागुद्दी, लट्ठालट्ठी झाली. महाराष्ट्रात असा प्रसंग उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि नारायण राणे यांची भाजप-उपशाखा यांच्यात घडला. इकडे फडणवीस पुतळा प्रकरणात शांततेचे आवाहन करतात आणि तिकडे मुख्यमंत्रीपद सोडाच; पण केंद्रीय मंत्रीपदही पुन्हा न मिळाल्याने जळजळ होत असलेले नारायणराव राणे घरात घुसून मारण्याची भाषा करतात. 'शाळा तशी बाळा' या उक्तीप्रमाणे राणे यांचे दोनही चिरंजीव तर तीर्थरूपांपेक्षा भारी. एकास झाकावा आणि दुसऱ्यास काढावा. तीर्थरूपांनी केवळ इशारा दिला, चिरंजीवांची मजल त्या इशाऱ्यातील कृती करण्यापर्यंत गेली. त्याच वेळी आणखी विरोधाभास असा की उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणणार पुतळा अपघातावर राजकारण नको; पण त्यांचेच दुसरे सहउपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा राष्ट्रवादी त्यासाठी आंदोलन करणार. सत्ताधाऱ्यांनीच आंदोलनात उतरायचे हे भलतेच आक्रित.

# बहुजन भावा! संघटित हो आणि संघर्ष कर!

मराठा सेवा संघ ही संस्था शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांनी १९९० साली स्थापन केली. या संस्थेच्या मार्फत संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, जगतगुरू तुकोबाराय साहित्य परिषद, शहीद भगतसिंग विद्यार्थी परिषद असे ३३ कक्ष चालविले जातात. या संस्थेने समाजात प्रबोधन करून १२ जानेवारी रोजी जगातील सतरावा शिवधर्म स्थापन केला. विज्ञानावर आधारित मानवतावादी मुल्यांची जपणूक करणारा हा धर्म आहे. सेवा संघाच्या वतीने सिंदखेड राजा येथे दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सव साजरा केला जातो. शिवधर्म स्थापनेला १४लाख बहुजन मराठा शिवभक्त उपस्थित होते. आपण माणसातल्या माणुसकी धर्माप्रती बांधिलकी जपणाऱ्या शिवधर्माचे सेवक आहोत. शिवसाधक हा कुठल्याही बंधनात अडकवला जाऊ शकत नाही. मराठा सेवा संघ हा शब्द वाचला की, अनेकांना प्रश्न पडतो, ही नेमकी कोणती संस्था आहे? त्याचे काय काम आहे? त्याच्या माहितीविषयी हा थोडासाच प्रयत्न. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा महत्त्वपूर्ण लेख अभ्यासा.... संपादक.

दि.१ सप्टेंबर १९९० रोजी बहुजन समाजांतील सर्व घटकांनी विरोध, द्वेष सोडून एकत्र यावं या उदात्त हेतुने ॲड.पुरुषोत्तम खेडेकर यांनी इतिहासाचा सखोल अभ्यास आणि चिंतन करून मराठा सेवा संघाची स्थापना अकोला येथे केली. मराठा सेवा संघ व त्याअंतर्गत ३३ कक्षांच्या माध्यमातून सर्व मराठा समाजाच्या अथक परिश्रमामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरोगामी विचारांचे सशक्त व राष्ट्रनिर्मितीकरिता बलशाली संघटन म्हणून मराठा सेवा संघ सर्वांना सुपरिचित झाला आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे शेकडो वर्षांपासून पुरुषसंस्कृती असतांनासुद्धा मराठा सेवा संघाने संपूर्ण देशाला अभिमान वाटावा असा मातृतिर्थ सिंडखेडराजा येथे मांसाहेब जिजाऊंच्या जन्मस्थळी जिजाऊ सृष्टीचा भव्यदिव्य प्रकल्प हाती घेतला आणि अत्यंत जलद गतीने हा प्रकल्प पूर्णही होत आहे. संपूर्ण जगाला हेवा वाटावा असा हा प्रकल्प, खरेच हा मातृसत्तेचा गौरव, सन्मान मराठा सेवा संघच करू शकतो. मातृशक्तीचा प्रत्यक्ष कृतीतून सन्मान करणारं जगातील एकमेव संघटन म्हणजे मराठा सेवा संघ!

सन १९९६पासून मराठा सेवा संघ ही पुरोगामी विचारधारेची ढाल आणि विकृतीवर आक्रमकपणे घणाघाती वार करणारी तीक्ष्ण तलवार अशी ओळख धारण करणारी संस्था आहे. खरंतर मराठा सेवा संघाने नेमकं कोणतं कार्य केलं? हा प्रश्न महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना कधीच पडत नाही. परंतु समाजातील धार्मिक आणि जातीय द्वेष पसरविणाऱ्या विघातक प्रवृत्तींनी सर्वसामान्य लोकांपर्यंत मराठा सेवा संघ आणि त्याचे वास्तविक विचार पोहोचू नयेत म्हणून त्याविषयीची बदनामीची मोहीम राबवली, जो अपप्रचार केला,जे चुकीचे चित्र समाजासमोर उभे केले, ज्यामुळे सर्वसामान्य लोकांना मराठा सेवा संघाचे मुख्य उद्देश आणि भरीव कार्य याविषयी प्रश्न पडणे साहजिक आहे. ही माहिती वाचून थोडी जरी भर पडली तर या लेखप्रपंचामागील हेतू सफल झाला, असे म्हणता येईल.

मराठा सेवा संघाचे कार्ये; महाराष्ट्राच्या सामाजिक भुमीची नव्याने मशागत केली, सर्वांना जय जिजाऊ, जय शिवराय!, एक मराठा, लाख मराठा!, अशी आपुलकीची घोषवाक्य दिली. राष्ट्रमाता जिजाऊंच्या नावाला जय जिजाऊ! असे अभिवादनमुल्य प्राप्त करून देवून लाखो लोकांना एकत्र आणले; पूर्वी राष्ट्रमाता जिजाऊंचे कोणताच चित्र, फोटो उपलब्ध नव्हते, त्यांचे तैलचित्र बनवून ते अधिकृत करून राज्याच्या मंत्रालयात लावून घेतले. विधानसभेत शिवजयंतीच्या तारखेच्या वादावर चर्चा घडवून १९ फेब्रुवारी ही शिवजयंतीची अधिकृत तारीख निश्चित करून घेतली आणि वादावर कायमचा पडदा पाडला. १२ जानेवारी हा मांसाहेब जिजाऊंचा राष्ट्रीय जन्मोत्सव दिन जाहीर केला. सन १९९०पूर्वी हा दिवस इतिहासजमा झाला होता. परंतु जिजाऊंच्या जन्मगावी सिंदखेडराजा येथे खेडेकर साहेबांनी जिजाऊ जन्मोत्सवाचा प्रारंभ केला आणि आज खेडोपाडी हा दिवस राष्ट्रीय सण म्हणून युवक, युवती आबालवृद्ध मोठ्या उत्साहात साजरा करताना दिसतात.

मांसाहेबांवर लेखन केले जात आहे. त्यांच्या चरित्राचे विविध पैलू विचारवंत आपल्या भाषणातून लेखातून उलगडून समाजापुढे ठेवू लागले आहेत. जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांचा उत्साह १२ जानेवारी जिजाऊ जन्मोत्सव दिनी अत्युच्च बिंदूवर शिगेला पोहोचत असतो. मराठा समाजाला त्यानिमित्ताने एका नव्या सांस्कृतिक पर्वाचा लाभ झालेला आहे. सिंदखेडराजा या बुलडाण्यातील जिजाऊंच्या जन्मगावी लाखाहून अधिक लोक शेकडो गाड्यांतून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जय जिजाऊ, जय शिवराय! असा उद्घोष, ऐतिहासिक स्फूर्तिदायक पोवाड्यांचे गायन हे सारे काही मन उल्हासीत, प्रफुल्लित करणारे असते. १९ फेब्रुवारी- शिवजयंती किल्ले शिवनेरी, १४ मे- शंभुजयंती किल्ले पुरंदर, ६ जून- शिवराज्याभिषेक किल्ले रायगड हे उत्सव सुरू केले. २९ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्रात शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यासाठी शासननाकडे यशस्वी पाठपुरावा केला. पानिपतच्या युद्धातून वाचलेले रोड मराठा आणि महाराष्ट्रातील मराठा बांधवांचा मराठा मिलन समारोह घडवून आणला. धार्मिक, विद्वेषातून दगडं उचलणाऱ्या युवकांच्या हातात वैचारिक पुस्तकं दिली आणि महाराष्ट्रातील जातीय सलोखा वाढविला. इतिहासाच्या पुनर्लेखनाची चळवळ उभारून इतिहासाचे विकृतीकरण करणाऱ्यावर दहशत बसविली. महापुरुषांचे विचार घराघरापर्यंत घेऊन जाणाऱ्या लेखक, कवी, शाहीर, कलाकारांची मोठी फळी तयार केली. समाजाला आपल्या पूर्वजांच्या शौर्याची जाणीव करून दिली. लेखकांना वाचकवर्ग, वक्त्यांना श्रोतावर्ग, कलाकारांना प्रेक्षकवर्ग आणि अख्ख्या महाराष्ट्राला वैचारिक वर्ग प्राप्त करून दिला. धार्मिक गोष्टींचा विचार करता धर्माचार्य उदात्त विचार सांगणारी शिवधर्म गाथा दिली. आपली नाणी, वाणी, गाणी, लेखणी आणि करणी आपण आपल्याच लोकांविरोधात वापरू नये, ही आचारसंहिता दिली. युवकांना बुटांच्या पॉलिशपासून डोक्याच्या मालिशपर्यंत कोणताही व्यवसाय करण्याची मुभा व दृष्टीही दिली. धर्मसत्ता, राजसत्ता, शिक्षणसत्ता, अर्थसत्ता, प्रचार-प्रसारमाध्यमसत्ता, यांचे महत्त्व समाजाला पटवून दिले. अज्ञात, अंधश्रद्धा, अहंकार, आणि न्यूनगंड ही समाजाच्या अधोगतीची कारणे आहेत याची सर्वांना जाणीव करून दिली. समाजातील सांस्कृतिक दहशतवाद संपवण्यासाठी समाजाला सांस्कृतिक वारसा आणि बुद्ध, तुकोबा, शिवराय, शाहू, फुले, आंबेडकर ही साखळी समजावून सांगितली. मराठा सेवा संघाचे कार्य प्रत्यक्षात जितके दिसून येते तितकेच अप्रत्यक्ष महाराष्ट्रातील सर्व समाजघटकांवर मराठा सेवा संघाच्या चळवळीचा प्रभाव पडला आहे. जे अनेक युवक वेगवेगळ्या विषयांवर निर्भीडपणे व्यक्त होतात, त्यासाठी मराठा सेवा संघाचे खूप मोठा आधार मिळत आला आहे. !! मराठा सेवा संघ स्थापन दिन चिरायु होवो !!

**************

- संकलन व सुलेखन -

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# 'ईडा पिडा घेऊन जा गे मारबत'

पोळ्याच्या पाडव्या दिनी 'मारबतीची' परंपरा व ऐतिहासिक मिरवणूक नागपूर नगरीचा ठेवा ! ही मिरवणूक तर नागपूरची आन, बान आणि शान आहे, हा उत्सव त्या मागचा उद्देश !

काळी व पिवळी मारबत असे दोन प्रकार आहेत. चार दिवस तिची विधिवत स्थापना केली जाते. लहान मोठे सांस्कृतिक कार्यक्रम या निमित्ताने होतात. महाप्रसादाचे आयोजन केले जाते आणि तान्ह्या पोळ्याच्या दिवशी यांची मिरवणूक काढली जाते. आणि दहन केले जाते. लहान मोठे सगळेजण मिरवणूक मार्गाच्या दुतर्फा उभे राहून मारबत व बडग्या बघतात. या दिवशी नागपूर व जवळपासच्या गाव-खेडयातील लोकं नागपूरला आपल्या लहानग्यांना घेउन येतात. आज या शेकडो वर्षांच्या परंपरेला टिकवून नागपूरची ओळख आणि वेगळेपण हे औचित्य साध्य झाल्यामुळे आजही टिकून आहे. ऐतिहासिक सोहळा नागपूर नगरीचा ठेवा अनेकांना कळावा यासाठी हा लेखन प्रपंच !

पूर्वी मारबत महोत्सव थोडा बिभत्सेकडे झुकलेला होता. त्यामुळे मारबत मिरवणुकीत जाणे हीन अभिरुचीचे मानले जायचे. पण आता परिस्थिती बदलली आहे. भारतातला हा एकमेव उत्सव नागपूर शहरात संपन्न होत असतो, त्या मागे उदात्त हेतू आहे. 'हे लक्षात आल्याने आता मारबत मिरवणुकीतील असभ्यता बऱ्यापैकी कमी झालेली आहे. कित्येक भाविक स्वतःच्या समस्या दूर व्हाव्यात म्हणून मारबतीला नवस बोलतात. वर्षानुवर्षे प्रचंड उत्साहात हा सोहळा साजरा होतो, होत राहील. तेव्हा या मारबत सोहळयात सहभागी होऊ आणि म्हणूयात - मना मनातली अस्वस्थता, हेवेदावे, भीती, रोगराई घेऊन जाऽऽ गे मारबत सगळे अशुभ, अमंगळ घेऊन जाऽऽ गे मारबतऽऽऽ! या आरोळ्यांनी दरवर्षी 'तान्ह्या पोळ्या' च्या दिवशी नागपूरातील महाल इतवारी भाग - दुमदुमुन गेलेला असतो. मारबत हा सोहळा संपूर्ण भारतात फक्त नागपुरातच भव्य दिव्य स्वरुपात साजरा होतो. मारबतही नागपूरकरांची अशी ग्रामदेवता आहे की ती या गावावर येणारी सगळी संकटे, आपल्या सोबत दूर घेऊन जाते आणि विसर्जित होते.

काळी मारबत १३८ वर्षांपासून चालू आहे. या काळ्या मारबतीचा संबंध महाभारतकाळाशीही जोडल्या जातो. पुतना मावशीचे रूप धारण करून भगवान कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला आणि कृष्णाच्या हातून तिचा मृत्यू झाल्यावर गावकऱ्यांनी तिची धिंड अर्थात मारबत काढली आणि गावाबाहेर तिला जाळले. यामुळे गावावर पुन्हा कधीही समस्या, संकटे आली नाहीत, अशी आख्यायिका आहे. याच संदर्भाने नागपुरातही काळी-पिवळी मारबत काढण्यात येते. या मारबतींना शहराच्या बाहेर जाळल्याने शहरातील कुरीती आणि संकटे संपतात, अशी मान्यता आहे.

जन्माष्टमी नंतर सणवार एकमेकांच्या हाता हात गुंफुन येतात पिठोरी अमास्येनंतर भाद्रपदात गौरी-गणपतीचे आगमन होते. खरंतर विचाऱ्या अमावस्येला सर्वजणच आळतात त्यादिवशी मुहूर्त, नवीन खरेदी, गोडधोड काही नसतं. अपवाद फक्त दोनच. एक श्रावणी अमावस्या आणि दुसरी लक्ष्मीपूजनाची आश्विन अमावस्या बैलपोळयाची दर्शग पिठोरी अमावस्या म्हणजे श्रावण आणि भाद्रपदामधला संधिकाल. बैलपोळयापासुन अनंत चतुर्दशीपर्यंत काही सण एकमेकांना बिलगुन उभे आहेत. त्यांच्यातला एक समान दुवा म्हणजे गल्ली-बोळींमधुन अत्यंत उत्साहाने काढण्यात येणाऱ्या मिरवणुका, बैलपोळ्याला सजवलेल्या बैलांची वाजत-गाजत मिरवणूक निघते तर दुसऱ्या दिवशी तान्ह्या पोळ्याला कालीपिलीची मारबत निघते. अनंत चतुर्दशीला पुन्हा ढोलताशा वाजतो आणि एरवी सुस्तावलेली गल्लीबोळ त्यावर बेभान थिरकू लागते.

मूळात मारबत ही प्रथा मध्यप्रदेशातील काही आदिवासी जमातीत दिवाळीच्या रात्री पाळली जाते. विशिष्ट आकारातली मातीची मूर्ती इडा पीडा, अमंगलतेचे प्रतिक म्हणून गावाबाहेर ढकलत नेतात. पण मग ही प्रथा खूप वेगळ्या स्वरूपात नागपुरात कशी रुजली? यामागचा इतिहास असा की, महाराणी बाकाबाई भोसले या नागपूर भोसल्यांच्या राणीने इंग्रजांशी तथाकथित हातमिळवणी केली. त्यामुळे नागपूरचे समाजमानस क्षुब्ध झाले. या घडल्या घटनेचा मोठ्या प्रमाणावर निषेध करण्यासाठी बाकाबाईला स्वार्थी, देशद्रोही ठरवून त्यांचे प्रतिक म्हणून काळ्या मारबती चा जन्म झाला. तसेच त्यांचे पती रघुजीराजे भोसले (दुसरे) यांनी त्यांना रोखले नाही म्हणून त्यांचे प्रतिक बडग्याच्या रूपाने अवतरले. पुढे इंग्रजांना नामोहरम करण्यासाठी कर्तबगार बाकाबाई भोसल्यांची ती रणनीती होती हे सिद्ध झाले. पण सुरू झालेली प्रथा बंद पाडणे नागपूरकरांना शक्य झाले नाही. मग मारबत ही दुष्टता, अमंगळ रूढी यांचे वहन करून स्वतः सोबत घेऊन जाणारी देवता म्हणून जनमानसात रुजली आणि आता वर्षानुवर्षे ही प्रथा पाळली जाते. तर, विविध सामाजिक समस्या, अनिष्ट रूढी, परंपरा यांचं प्रतिक म्हणून विविध पिवळी मारबत निघते.

काळ्या मारबतीला पुतना मावशीचं रूप मानलं जातं. म्हणूनच तिच्या स्तनांमधून दुग्धधारा पाझरतात. अनंत चतुर्थीच्या अगोदर भागवत एकादशीला वामन जयंती असते. हे सर्व दिवस प्राचीन संस्कृतीच्या अद्भुत धाग्याने गुंफलेले आहेत. बाळकृष्ण आणि पुतना मावशीची गोष्ट विष्णुपुराण, भागवत पुराण, हरिवंश, ब्रह्मपुराण, अग्निपुराण, पद्मपुराण आणि ब्रम्हवैवर्त पुराणामध्ये थोडयाफार फरकाने दिली आहे. सर्वच पुराणांमध्ये आहे की, कंसाने पुतनेला बाळकृष्णाला मारण्यासाठी पाठविले. हरवंश आणि पद्मपुराणामध्ये ती रात्री येऊन लहान मुलांना मारते. काळया मारबतीने हाच रात्रीचा रंग ल्येवलेला आहे. भागवत आणि ब्रम्हवैवर्त पुराणानुसार पुतनेच्या मनीचा भाव कसाही असा. श्रीकृष्णाच्या स्पर्शाने तिला मोक्ष प्राप्त झाला. बाळकृष्णाने मारल्यावर गावकऱ्यांनी तिच्या अंगाचे लचके तोडून तिला जाळले. पण त्या धुरातून दिव्य सुगंध येऊ लागला ती मुक्तात्मा झाली, म्हणुन तिचे महत्व.

वैदिक व नंतरच्या काळात बरेचदा वामनाचा उल्लेख आलेला आहे. बुटक्या आणि खुज्या माणसांच्या कथांमध्ये बुटका केवळ ठेंगणा नसतो तर त्यात असाधारण अशी दैवी शक्ती दिसते. 'हिमगौरी आणि सात बुटके' ही कथा प्रत्येकाने वाचली असेलच. बलीराजाला पाताळात गाडण्यासाठी विष्णूने वामनाचे रूप घेतले तसेच दुसऱ्याही एका कथेत धुंधु राक्षसाचा वामनाचे रूप घेऊन त्याने पराभव केला आहे. कश्यप आणि दनु यांचा मुलगा धुंधु स्वर्गप्राप्ती होण्यासाठी अश्वमेध यज्ञ करतो आणि देव घाबरून विष्णूकडे मदतीसाठी धावतात. त्यामुळे वामनाचे रूप घेऊन विष्णू धुंधुकडे आला आणि आल्यावर देविका नदीच्या पात्रात स्वतःला झोकून दिले. यज्ञ सोडून सर्वजण त्याला वाचविण्यासाठी गेले तेव्हा तो म्हणाला की, निर्धन असा मी वर्षभरापासून गटांगळ्या खात आहे. धुंधुने त्याला वर मागण्यास सांगितले, तेव्हा वामन म्हणाला, मी बुटका, काय मागणार! मला माझ्या तीन पावलांएवढ्या लांबीची भूमी दे. धुंधुने मान्य केल्यावर वामनाने दोन पावलातच सबंध विश्व व्यापून टाकले आणि तिसरे पाऊल ठेवले ते धुंधु राक्षसाच्या पाठीवरच !

श्रावणी अमावास्येला बैलपोळा सजतो. घरोघरी पुरणपोळीचा गोडसर खमंग वास येत असतो. खांदेमळणी करून सायंकाळी बैलांच्या खांद्याला हुरमुज मळला जातो. बैलाच्या शिंगाला रंग लावून बेगड चिटकवायचे. नवीन दावन, पेंडी, गळ्यात कडे, नव्या वेसणी, म्होरक्या घालून अंगावर रंगांचे ठिपके, शिंगाला शेंब्या गोंडे, पायात वाळे, झुली, बाशिंग, चाळ घालून सजवलेल्या सर्जाची गावात वाजत-गाजत मिरवणूक निघते. घरी आल्यावर ओवाळून नैवेद्य दाखवून पुरणपोळी खाऊ घालायची. दुसरे दिवशी नदी-ओढ्यात 'घेऊन पोहणी करायची.

तान्ह्या पोळ्याला भल्या पहाटे उठून आमच्या लाकडी बैलांची डागडुजी आम्ही करून ठेवायचो. कारण सकाळी १० वाजेपासूनच मारबती सुरू व्हायच्या. आई तहान लाडू, भूक लाडू डब्यात बांधून द्यायची. उड्या मारतच नेहरू चौकात जाऊन मोक्याची जागा पकडायची. बोंबा मारत इतवारीच्या मोहल्ल्यांमधून या मारबती मिरवतात. सोबत बडगेही असतात. डेंग्युले घिऊन जाय गें मारबत..... बद्याडाले घेऊन जाय रे बडग्या... रस्त्याच्या दुतर्फा तोबा गर्दी असते. या गर्दीत हरवून विस्फारलेल्या डोळ्यांनी मारबत पाहणं म्हणजे वैदर्भीय संस्कृतीचा भव्य-दिव्य सोहळा अनुभवणं असतं.

नागपूरची मारबत प्राचीन संस्कृतीचे प्रतीक आहेच. त्याचबरोबर आपल्या सामूहिक सुख-दुखाःचा ती एक आश्वस्त हूंकार आहे. जेव्हा तिची लेकरं 'ईडा पिडा घेऊन जा गे मारबत' अशी मनापासुन साद घालतात, तेव्हा इडा-पीडा पोटात घेऊन ती माउली धगधगत्या अग्नीला हसत हसत आलिंगन देते.

मारबत, बडग्या अमंगळतेचे प्रतिक
प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# 'बेटी बचाओ बेटी पढाओ' केवळ घोषणेपुरतेच?

कायद्यात स्त्री- पुरुषांना समान हक्क दिले गेले आहेत ना? मग पुरुष म्हणून एकेरी वर्चस्व का गाजवले जाते? स्त्रियांची अवस्था ही हरणांसारखी झाली आहे. सिंह, वाघ कधी झडप घालतील हे सांगता येत नाही. बालवाडीतील कोवळ्या मुलीही वासनेला बळी पडत आहेत. समाज म्हणून आपण आणखी किती रसातळाला जाणार आहोत? रोज एक नवीन बलात्कार, क्रूर मरण समोर येत आहे. असे किती काळ चालणार? भारताचे, येथील संस्कृतीचे कौतुक करणाऱ्या पोस्ट, कविता, लेख पुरे झाले. इतिहास माहीत आहे सर्वांना. रोज त्याचीच पारायणे करून सत्य परिस्थिती बदलणार आहे का? 'माझा भारत महान', 'शूरवीर, संत जन्मले' वगैरे वगैरे खूप झाले गोडवे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केलेल्या देशात आजही महिला बळी का? पडत आहेत? अन्य देशांत महिलांच्या सुरक्षेची किती काटेकोर काळजी घेतली जाते आणि भारतात मात्र जागोजागी, गल्लोगल्लीत रोडरोमीओ, छपरी, टपोरी टपून बसलेले असतात. त्या कोलकात्यातील डॉक्टर तरुणीची काय चूक? १ जुलैपासून नवीन भारतीय न्याय संहितेची अंमलबजावणी सुरू झाली, त्याने किती फरक पडेल? आजकाल टेबलावरून आणि टेबलाखालून खिसा भरण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे कायदे कितीही कठोर केले तरीही फरक पडेल असे वाटत नाही. या प्रकारांमुळेच नागरिकांचा सुरक्षा यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेवर विश्वास राहिलेला नाही. बदलापुरमध्ये झालेला प्रकार अत्यंत निंदनीय आहे. आता तीन- चार वर्षांच्या मुलींवर असे अत्याचार होणार असतील, तर माणुसकी नामशेष झाली आहे, असेच म्हणावे लागेल. नालासोपाऱ्यातही शिक्षकाने एका विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केल्याचे वृत्त आहे. अशा वेळी पालकांनी मुलांना शाळेत तरी कसे पाठवायचे. शाळा हे ज्ञानाचे मंदिर आहे. तिथे मुले सर्वाधिक सुरक्षित असतात, असे मानले जाते, मात्र या मंदिरातही मुली असुरक्षित असतील, तर धन्य माझा देश आणि धन्य माझे सरकार बदलापुरामध्ये झालेल्या घटनेप्रकरणी साधा एफआयआरही नोंदवून घेण्यास पोलीस तयार नव्हते. असे का झाले? परिसरातील रहिवाशांनी आंदोलन केले, मध्य रेल्वेची सेवा बंद पाडली, तेव्हा या विलंबास जबाबदार असलेल्या पोलिसांना, शाळेच्या मुख्यध्यापिकेला निलंबित करण्याचे आश्वासन दिले गेले. बदलापूरचे आंदोलन तीव्र आणि सरकारला आरसा दाखविणारे, जागे करणारे होते.

इतके पोलीस कर्मचारी होते तिथे, मंत्री येऊन गेले, राजकीय नेते येऊन गेले, तिथल्या परिस्थितीचा आढावा घेतला, आम्ही मुलींच्या पाठीशी आहोत असे सांगण्यात आले. काही दिवसांनी हा सारा असंतोष निवळेल पण ही प्रकरणे थांबणार नाहीत. पुण्यात एका अल्पवयीन मुलीला दारू पाजून तिच्यावर बलात्कार केला गेला होता. मुंबईत नागपाडा येथे आठ वर्षीय मुलीचा विनयभंग करण्यात आला. या बालिकांची सुरक्षा वाऱ्यावर सोडण्यात आली आहे. याला जबाबदार कोण? मुलींना जन्म द्यायचा की नाही हे सांगा आता. आज मुलगी / स्त्री ना शाळेत सुरक्षित आहे, ना महाविद्यालयात, ना कार्यालयात ना मंदिरात. इतकेच काय ती स्वतःच्या घरात सुद्धा सुरक्षित राहिलेली नाही. दारुडा बाप किंवा भाऊ किंवा अन्य कोणी तथाकथित जवळचा नातेवाईक तिचे शोषण करत असल्याची वृत्ते रोज वृत्तपत्रांत येतात. नालासोपारा येथे घडलेली घटनाही याच वर्गातली. मुलींनी कोणाची मदत मागावी? खरे सांगायचे तर मेणबत्ती मोर्चा, मूक मोर्चा, आंदोलने याने काही साध्य होईल, असे आता वाटेनासे झाले आहे. कारण हे सर्व आपण कितीतरी वर्षांपासून करत आलो आहोत. फायदा काहीच झाला नाही. घोषणा दिल्या जातात, पोस्टर दाखवून निषेध केला जातो, माध्यमे थेट प्रक्षेपण करतात, दोन दिवस चर्चा होते आणि नंतर सर्वजण आपापल्या कामात मागचे सारे विसरून जातात. कायदा हातात घेणे योग्य नाही. मात्र तारीख पे तारीखमुळे आरोपींना जी सूट मिळते, त्यामुळे सर्वांनाच तातडीने न्याय मिळवा, आरोपीला गर्दीच्या स्वाधीन करावे, असे वाटू लागले आहे. आपल्याला कोणीतरी सोडवेल किंवा आमचे फार काही बिघडणार नाही, हा विश्वास घातक ठरतो. यातून नवीन गुन्हे घडत जातात. फाशी विषयीचे नियम एवढे वेळखाऊ आहेत की फाशीची शिक्षा झाल्यानंतरही आरोपी प्रदीर्घकाळ तुरुंगात त्यांचे दैनंदिन जीवन जगत असतात. हे पाहून प्रश्न पडतो की मुलींना जन्म द्यायचा की नाही? दिला तर त्यांना शाळा, महाविद्यालयात, शिकवणीला पाठवयाचे की नाही? त्यांना नोकरी करून द्यायची की नाही? आता पाणी डोक्यावरून गेले आहे. असेच सुरू राहिले पुढे तर पुढचा काळ मुलींसाठी अधिक भयानक होत राहील.

# शिळ डायघर पोलीस ठाणे, ठाणे शहर आणि गंगामाता वाहन शोध संस्थेने लावला ७७ गाडयांच्या मुळ मालकाचा शोध







शिळ डायघर पोलीस ठाणेत बेवारस मालमत्तेतील एकुण ७७ वाहने पोलीस ठाणेच्या अवारात बऱ्याच कालावधीपासुन जमा आहेत त्यापैकी ७० दुचाकी व ०६ चार चाकी व ०१ अँटो रिक्षा अशी एकुण ७७ वाहने बेवारस अवस्थेत अनेक वर्षापासुन धुळखात पडुन आहेत त्यामुळे आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणुन बेवारस वाहने ज्या मालकांची आहेत त्यांनी आपल्या वाहनाची कागदपत्रे दाखवुन सात दिवसाच्या आत घेवुन जावेत अन्यथा पोलीसांकडुन त्या वाहनाची कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल असे आवाहन शिळ डायघर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे यांनी केले आहे. पोलीस ठाणेस शेकडो वाहने विविध गुन्हयात पोलीस जप्त करतात मात्र न्यायालयीन प्रक्रीयेमुळे व बेवारस वाहनाचे मालक मिळुन येत नसल्याने ही वाहने पोलीस ठाणेच्या आवारात अनेक वर्ष मालकाच्या प्रतीक्षेत धुळखात पडुन आहेत या पार्श्वभुमीवर ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे साहेब यांनी बेवारस वाहनांच्या मालकाचा शोध घेवुन ती वाहने त्यांच्या ताब्यात देण्याचे आदेश प्रभारी अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार पोलीस सह आयुक्त चव्हाण सर, अपर पोलीस आयुक्त देशमुख सर, परिमंडळ १ पोलीस उप आयुक्त बुरसे सर, कळवा विभागाचे सहा पोलीस आयुक्त कोळेकर सर व शिळ डायघर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे यांचे मार्गदर्शनानुसार पोलीसांनी बेवारस वाहनाच्या मालकाचा शोध घेण्यास सुरूवात केली त्यासाठी पोलीसांनी परंदवाडी तळेगाव दाभाडे, ता मावळ, जि पुणे येथील महाराष्ट्रात अग्रेसर असलेल्या गंगामाता वाहन शोध संस्थेची मदत घेतली या संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी शिळ डायघर पोलीस ठाण्यात येत बेवारस अवस्थेत असलेल्या वाहनाची पाहणी केली उदावंत व पोलीसांनी बेवारस वाहनांचे चेसीस नं व इंजिन क्रमाकांवरून दोनच दिवसात ७७ वाहनाच्या मुळ मालकाचा शोध लावला. त्यासाठी पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुनिल वरुडे, पो. हवा/भरत जाधव, पो. हवा/विकांत कांबळे, पो.ना/राजेंद्र दणाणे (मुद्देमाल कारकुन), पो.ना./ गणेश देशमुख यांच्यासह गंगामाता वाहून शोध संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत, उपाध्यक्ष बाबासाहेब बागडे, भारत वाघ, यांनी परिश्रम घेतले. तसेच ज्या मालकाची वाहने असतील त्यांनी पोलीस ठाणेस येवुन आपले वाहन तपासुन घेवुन जावे. तसेच सदरचे वाहन घेवुन न गेल्यास कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करून त्यांचा लिलाव केला जाईल व त्यातुन आलेली रक्कम सरकारी तिजोरीत भरण्यात येईल असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे यांनी सांगीतले आहे.

असा लावला जातो शोध :–

सुरवातीला वाहनाचे चेसीस व इंजीन नंबर यांची यादी केली जाते. त्यानंतर वाहनाची विभागणी करून बेवारस, अपघात व गुन्हयातील वाहने अशी वर्गवारी करून मुळ मालकाचा घराचा पत्ता शोधला जातो. अनेकदा वाहन मालकाचा जुना पत्ता रजिस्टर नोंद असल्याने मालक त्या पत्यावर मिळुन येत नाही. वाहनाची बारकाईने माहिति गोळा करून मुळ मालकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जातो. असे संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी सांगितले.

## उमरखेड मतदारसंघात प्रवीण वानखेडे यांच्या नावाची चर्चा

मतदारसंघ चा विकास काम जलद गतीने होईल विकास कामाची जाण असणाऱ्या पंचायत समिती बिडीओ प्रवीण वानखेडे यांना उमेदवारी मिळाल्यास मतदार संघ मध्ये त्याना आमदार बनवू –जयसिंग राठोड मतदार उमरखेड विधानसभा मतदारसंघ मध्ये सर्वपरिचित असणारे गोर गरीब गरजू लोकांची जाण असणारे गोर गरीब जनतेच्या कामे लवकर व्हावी म्हणून नेहमी पुढाकार घेतात मार्गदर्शन करतात वेळेवर त्याची कामे करून देतात असा अधिकारी आमदार झाला तर विकास होईल

मध्ये त्याना आमदार बनवू
–जयसिंग राठोड मतदार उमरखेड विधानसभा
मतदारसंघ मध्ये सर्वपरिचित असणारे गोर गरीब गरजू लोकांची जाण असणारे गोर गरीब जनतेच्या कामे लवकर व्हावी म्हणून नेहमी पुढाकार घेतात मार्गदर्शन करतात वेळेवर त्याची कामे करून देतात असा अधिकारी आमदार झाला तर विकास होईल सामाजिक कार्यात नेमही पुढे असतात गरजू लोकांच्या समस्या साठी नेहमी पुढाकार घेतात त्याना मदत करतात असा अधिकारी आमदार झाल्यास विकास काम होईल
सुनील राठोड उमरखेड विधानसभा मतदार

उमरखेड/ लखन जाधव:– उमरखेड तालुका पंचायत समिती अधिकारी पदावर असणारे बिडीओ प्रवीण कुमार वानखेडे कर्तव्य दक्ष तडफदार असणारे अधिकारी मागील तीन वर्ष पासून तालुक्यातील गोर गरीब गरजू लोकांची कामे लवकर करून देतात शासनाच्या विविध योजना माध्यमातून गरजू लोकांना लाभ मिळवून देतात लोकांना मार्गदर्शन करतात यामुळे जनतेच्या मनात लोकप्रिय आहे गरजू लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी नेमही पुढाकार घेतात गरज लागली तर गरजू लोकांना मदत करतात



मतदारसंघातील सर्व गाव खेड्यातील सर्व लोकांसोबत सर्व परिचत सखोल अभ्यास असणाऱ्या कर्तव्यदक्ष अधिकारी असणाऱ्या पंचायत समिती बिडीओ प्रवीण कुमार वानखेडे यांच्या नावाची चर्चा मतदारसंघातील गाव खेडो पाडीग्रामीण कट्यातील पारावर प्रवीण कुमार वानखेडे यांना आमदार बनवू अशी चर्चा चालू आहे मतदारसंघ चा विकास काम जलद गतीने होईल विकास कामाची जाण असणाऱ्या पंचायत समिती बिडीओ प्रवीण वानखेडे यांना उमेदवारी मिळाल्यास मतदार संघ

## रक्ताचा एक एक थेंब शुद्ध करते 'ही' भाजी ; सेवन ठरेल आरोग्यासाठी फायदेशीर

अलीकडच्या व्यस्त जीवनात अनेक आरोग्यच्या समस्या उद्भवत आहेत. अनेक प्रकारच्या रोगराई वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी व्यायामासोबत आहारात देखील पौष्टीक गोष्टींचा समावेश करणे गरजेचे आहे. सगळ्या भाज्यांचे सेवन करणे गरजेचे आहे. प्रत्येक भाजी आपल्याला वेगवेगळे जीवनसत्त्वे देते. त्याचा आपला शरिराला खूप फायदा होतो. त्या भाजींपैकीच एक म्हणजे तोंडली. अनेकांना तोंडल्याची भाजी आवडत नाही. पण या भाजीचे गुणधर्म तुम्हाला निरोगी ठेवण्यास मदत करते. आज आपण तोंडलीच्या भाजीचे फायदे जाणून घेणार आहोत. तोंडलीत आढळणारे पोषकत्त्वे तोंडली अनेक पोषक तत्वांनी समृद्ध आहे. यामध्ये अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे आढळतात ज्यामुळे ते आपल्या आरोग्यासाठी खूप उपयुक्त ठरते. त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी१, बी२, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस असे अनेक पोषक घटक आढळतात. तुम्ही तोंडली खात नसाल तर त्याचे सेवन सुरू करा. रक्त शुद्ध करण्याव्यतिरिक्त, मूत्रमार्गाच्या समस्या



आणि मधुमेहावर उपचार करण्यासाठी तोंडली प्रभावी आहे. याशिवाय बद्धकोष्ठता, त्वचेच्या समस्या, पचनाशी संबंधित समस्या, वृद्धत्व, कावीळ इत्यादींवर नियंत्रण ठेवण्यास तोंडल्याचे सेवन केल्याने मदत होते. तोंडली खाण्याचे आश्चर्यकारक फायदे विशेष म्हणजे तोंडलीमध्ये सर्दी आणि यकृताच्या कावीळला प्रतिबंध आणि बरा करण्याची क्षमता आहे. घश्याच्या समस्येवर तोंडली रामबाण उपाय आहे. तोंडली व्हिटॅमिन – आणि आणि कॅल्शियमचे मुख्य स्त्रोत आहे. या भाजीचे सेवन तुमची हाडे मजबूत करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. तोंडलीचे सेवन केल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळतो. तोंडलीत भरपूर प्रमाणात फायबर आढळते जे बद्धकोष्ठतेमध्ये फायदेशीर आहे. तोंडलीमध्ये वृद्धत्वविरोधी गुणधर्म आहेत. यासोबतच यामध्ये अँटिऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन ए आणि सी चांगल्या प्रमाणात असतात. हे पोषक मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास मदत करतात जे वृद्धत्वाच्या लक्षणांना प्रोत्साहन देतात. तोंडली रक्त शुद्ध करण्यास मदत करते.

## रोजच्या वापरातील 'या' ३ ड्रिंक्स करतील फॅटी लिव्हरचा त्रास कमी, जाणून घ्या तज्ज्ञांचा सल्ला

गेल्या काही वर्षांमध्ये फॅटी लिव्हरने त्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. अगदी मद्याला स्पर्श न करणाऱ्यांनादेखील याचा त्रास होऊ लागला आहे. फॅटी लिव्हरमुळे अनेक आजार बळावतात आणि याचा आपल्या आरोग्यावर अगदी वाईट परिणाम होऊ शकतो. परंतु, या फॅटी लिव्हरचा त्रास आपण या तीन ड्रिंक्सने घरच्या घरी नियंत्रणात आणू शकतो. चला तर मग जाणून घेऊयात या तीन मॅजिक ड्रिंक्सबद्दल हार्वर्डप्रशिक्षित डॉ. सौरभ सेठी यांनी नुकतीच एक इन्स्टाग्राम रील शेअर केली आहे, ज्यात त्यांनी फॅटी लिव्हरच्या समस्येसाठी ग्रीन टी, कॉफी आणि बीटरूट ज्यूस या तीन मॅजिक ड्रिंक्स घेण्याचा सल्ला दिला आहे. याबद्दल अधिक माहिती मिळावी यासाठी ने या ड्रिंकच्या संभाव्य फायद्यांबद्दल पोषणतज्ज्ञांशी संवाद साधला. ग्रीन टीमध्ये कॅटेचिन हा घटक असतो, जो यकृताचे कार्य सुधारण्यास आणि यकृतातील फॅट कमी करण्यास मदत करतो. कॉफीचा वापर यकृतातील एन्झाइमच्या खालच्या पातळीशी संबंधित आहे आणि हा संबंध यकृताच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. बीटरूट ज्यूसमध्ये बेटेन असते, जे यकृतामध्ये फॅट कमी जमा करते, असे च्या संस्थापक आणि पोषणतज्ज्ञ सुमन अग्रवाल यांनी सांगितले. ही ड्रिंक्स किती वेळा घ्यावीत? यकृताच्या आरोग्यासाठी दररोज तीन ते चार कप कॉफी, दोन ते तीन कप ग्रीन टी आणि एक कप बीटरूटचा रस घ्या, असे पोषणतज्ज्ञ पूजा पालरीवाला यांनी सांगितले. पूजा यांच्या मते हे प्रमाण सामान्यतः सुरक्षित असते आणि यकृतातील एन्झाइमची पातळी कमी करण्यास, यकृताचे कार्य सुधारण्यास आणि डिटॉक्सिफिकेशनसाठी मदत करते. तथापि, पूजा यांनी हेदेखील सांगितलं की, जास्त प्रमाणात ग्रीन टी घेतल्याने यकृत विषारी होऊ शकते. तसेच बीटरूटच्या रसात नैसर्गिक शर्करा जास्त असते, ज्यामुळे जास्त प्रमाणात बीटरूटचा वापर काहींसाठी, विशेषत: मधुमेहींसाठी धोकादायक ठरू शकतो. आहारतज्ज्ञ पूजा म्हणाल्या, बीटरूटमधील बीटेन घटक यकृताच्या फॅटवर प्रक्रिया करण्यास आणि ते कमी करण्यास मदत करते. बीटरूटमध्ये नायट्रेट्सदेखील असतात, जे रक्त प्रवाह सुधारू शकतात आणि यकृताच्या चांगल्या कार्यास प्रोत्साहन देऊ शकतात. फायबरची कमतरता आणि साखरेचे प्रमाण जास्त असल्याने पूजा यांनी ज्यूसऐवजी सॅलेडमध्ये बीटरूटचा वापर करण्याची शिफारीस केली.दोन्ही तज्ज्ञांनी अलर्टनेस, झोपेचा त्रास आणि इतर दुष्परिणाम टाळण्यासाठी सकाळी आणि दुपारच्यादरम्यान ग्रीन टी आणि कॉफीचे सेवन करण्याचे सुचवले. अग्रवाल यांनीदेखील बीटरूटमध्ये शर्करा जास्त असल्याचे सांगितले आणि मधुमेहींनी ते टाळण्याचा सल्ला दिला. त्या म्हणाल्या की, जास्त ग्रीन टी आणि कॉफीमुळे झोप कमी होणे, आम्लपित्त, लोहाचे शोषण कमी होणे आणि आतड्यांसंबंधी समस्या उद्भवू शकतात; म्हणून रिकाम्या पोटी या पेयाचे सेवन करू नये. हे पेय जेवणाबरोबर किंवा जेवणानंतर घेतले पाहिजे. नोट – हा लेख पब्लिक डोमेन आणि/किंवा आम्ही संवाद साधलेल्या तज्ज्ञांच्या माहितीवर आधारित आहे. तुमची दिनचर्या सुरू करण्यापूर्वी नेहमी आपल्या आरोग्य चिकित्सकांचा सल्ला घ्या.

## कोकणातील प्रसिद्ध नाश्त्याचा पदार्थ: तांदळाच्या पिठापासून बनवा मऊ जाळीदार सात काप्याचे घावणे

कोकणातील प्रत्येक घरात नाश्त्यासाठी सकाळी तांदळाच्या पिठापासून घावणे बनवले जातात. तांदळाच्या पिठापासून बनवलेले घावणे तुम्ही नाश्त्याला किंवा जेवणात सुद्धा खाऊ शकता. घावण्यांसोबत ओल्या खोबऱ्याची चटणी किंवा चहासोबत सुद्धा तुम्ही हे घावणे खाऊ शकता. कोकणातील खाद्यपदार्थांमध्ये घावण्यांचा समावेश आहे. कोकणात घरी आलेल्या पाहुण्यांना सुद्धा नाश्त्यामध्ये घावणे बनवून दिले जातात. कोकणातील घावणे जगभरात सगळीकडे प्रसिद्ध आहेत. घावण्याचं नाव ऐकल्यानंतर सगळ्यांचंच तोंडाला पाणी सुटते. जीवनशैलीमध्ये बदल झाला असला तरीसुद्धा अजूनही कोकणातील प्रत्येक गावात अजूनही नाश्त्यासाठी घावणे बनवले जातात. तसेच सण उत्सवाच्या दिवसांमध्ये कोकणात सात काप्याचे गोड घावणे बनवले जातात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सात काप्याचे घावणे बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ तुम्ही झटपट बनवू शकता. साहित्य: तांदळाचे पीठ मीठ गूळ ओलं खोबरं वेलची पावडर तूप कृती: सात काप्याचे घावणे बनवण्यासाठी सर्वप्रथम गोडाचे




सारण बनवण्यासाठी एक वाटी ओलं खोबरं किसून घ्या. कढई गरम करण्यासाठी ठेवून त्यात तूप टाकून गरम करून घ्या. नंतर त्यात ओलं खोबरं टाकून परतून घ्या. खोबरं थोडसं लाल झाल्यानंतर त्यात गूळ आणि वेलची पावडर टाकून मिक्स करून घ्या. सारण व्यवस्थित तयार झाल्यानंतर गॅस बंद करून घ्या. मोठ्या भांड्यात तांदळाचे पीठ घेऊन त्यात चवीनुसार मीठ टाका. नंतर त्यात पाणी टाकून मिश्रण तयार करा. यात जास्त पाणी टाकू नये. घावणे बनवण्यासाठी कावीळ किंवा पॅन गरम करण्यासाठी ठेवा.

## तुम्हाला सामान्य बाथरूमला लक्झरी लुक द्यायचा असेल तर या टिप्स वापरुन बघा

घरातील दिवाणखान्यापासून बाथरूमपर्यंत सर्व काही आलिशान बनवण्याची प्रत्येकाची इच्छा असते. मात्र, बजेटअभावी काही लोकांची ही इच्छा अपूर्णच राहिली आहे. तुम्हालाही तुमच्या घरातील वॉशरूम लक्झरी बनवायचे असेल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. आज आम्ही तुम्हाला अशाच काही टिप्स सांगणार आहोत, ज्याचे पालन करून तुम्ही तुमची वॉशरूम सहज बनवू शकता.

या टिप्स फॉलो करामोठमोठ्या आलिशान हॉटेल्ससारखी वॉशरूम आता तुमच्या घरीही उपलब्ध होणार आहेत. यासाठी तुम्ही बाथरूममध्ये काही सुगंधित मेणबत्त्या आणि आवश्यक तेल वापरू शकता. आपण ते ऑनलाईन किंवा कोणत्याही सजावटीच्या दुकानातून खरेदी करू शकता. हे तुमच्या वॉशरूमला लक्झरी लुक देण्यास मदत करेल.



वॉलपेपरचा वापरयाशिवाय, तुम्ही तुमच्या वॉशरूममध्ये सुंदर वॉलपेपर वापरू शकता, डिझायनर वॉलपेपर तुमच्या वॉशरूमला समृद्ध आणि विलासी लुक देतील. वॉशरूमची भिंत सजवण्यासाठी तुम्ही पेंटिंग करू शकता.रोपांचा वापरबाथरूमला आलिशान बनवण्यासाठी तुम्ही वॉशरूममध्ये लहान रोपे आणि भांडी ठेवू शकता, ज्यामुळे तुमच्या वॉशरूमला एक आलिशान लुक मिळेल. आपण त्यांना बाजूला असलेल्या ट्रेमध्ये ठेवू शकता. आपण सूर्यप्रकाशाशिवाय आत ठेवता येणारी झाडे वापरावीत.

शोकेस वापरातुमचे बाथरूम लक्झरी बनवण्यासाठी तुम्ही शोकेस वापरू शकता. त्यात तुम्ही वॉशरूमशी संबंधित वस्तू किंवा इतर काही सजावटीच्या वस्तू ठेवू शकता. या शोकेसमध्ये तुम्ही सुगंधित स्प्रे बाटल्यादेखील ठेवू शकता. यामुळे तुमची वॉशरूम सुंदर आणि सुगंधी होईल.

एक मिनी स्टोअर तयार करासिंकच्या खाली असलेल्या रिकाम्या जागेत तुम्ही मिनी स्टोअर बनवू शकता. येथे तुम्ही शॅम्पू, टूथपेस्ट, शेव्हिंग किट, टॉवेल यासारख्या गोष्टी ठेवू शकता, जेणेकरून तुमचे बाथरूम गोंधळलेले दिसत नाही आणि सर्व गोष्टी व्यवस्थित केल्या जातील. या टिप्सचा अवलंब करून तुम्ही तुमच्या घराच्या वॉशरूमला लक्झरी बनवू शकता.

झेन प्रेरित आयताकृती बाथरूम डिझाइनसर्वात आधुनिक बाथरूम डिझाईन्सपैकी एक म्हणजे स्वच्छ रेषा असलेले बाथरूम आणि हवेशीर आणि मोकळे वाटणारे निर्बाध डिझाइन. आदर्शपणे, लहान जागेचे आधुनिक आयताकृती बाथरूम डिझाइनमध्ये रूपांतर करण्यासाठी तुम्ही पेंट न केलेले लाकडी पोत आणि तटस्थ रंग वापरावे. झेन बाथरूममध्ये सहसा जपानी भिजवणारे टब वापरले जातात.

## दूध खराब होण्यापासून वाचवण्यासाठी सोपी पद्धत जाणून घ्या

अनेक वेळा चुकून दूध बाहेर ठेवले तर उकळताना आंबट किंवा दही होते. तुमचे पैसे वाया जाऊ नयेत आणि दूध खराब होण्यापासून वाचवायचे असेल, तर बेकिंग सोड्याची ही सोपी युक्ती वापरून पाहा. उन्हाळ्यात दूध काही तास बाहेर ठेवले तर ते खराब होते. ते उकळताच फुटते. पैसाही वाया जातो. बऱ्याच वेळा फ्रीझरमध्ये ठेवलेले ३–४ दुधाचे तुकडे उकळण्याचा प्रयत्न केला तर दुधाची चव खराब होते. दूध पिताना चव चांगली येत नाही. अशा परिस्थितीत त्याची शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी काय करावे याबद्दल आम्ही तुम्हाला एक अतिशय सोपी युक्ती सांगणार आहोत. आपण दूध दही खराब होण्यापासून कसे रोखू शकतो ते जाणून घेऊया.दुधाचे शेल्फ लाइफ वाढवण्याची सोपी युक्ती वास्तविक, दुधात किंचित आम्लयुक्त कि असते, परं तु दुधात असलेले बॅक्टेरिया लैक्टिक सिड तयार करतात आणि त्याचे दह्यामध्ये रूपांतर करतात, जे जास्त आम्लयुक्त असते. अशा परिस्थितीत, दही होऊ नये म्हणून तुम्ही दुधात बेकिंग सोडा टाकू शकता. बेकिंग सोडामध्ये असलेले अल्कधर्मी गुणधर्म जीवाणूंद्वारे तयार केलेल्या सिडला तटस्थ करतात. त्यामुळे दूध थोडेसे क्षारयुक्त होते.

# ठाणे राष्ट्रवादी काँग्रेस ठाणेकरांच्या मदतीसाठी, सेवेसाठी तत्पर, महाराष्ट्रवादी व्हॉट्स्प हेल्पलाईनचा लाभ घ्या !

**महाराष्ट्रवादी व्हॉट्स्प हेल्पलाईन ९८६१ ७१७१७१. या नंबरवर राज्यातील सर्व शासकीय योजनांची माहिती उपलब्ध – प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे**

ठाणे / प्रतिनिधी :– महाराष्ट्रवादी व्हॉट्स्प हेल्पलाईन ९८६१ ७१७१७१. या नंबरवर राज्यातील सर्व शासकीय योजनांची माहिती उपलब्ध आहे. यासाठी ठाणे राष्ट्रवादी काँग्रेस ठाणेकरांच्या मदतीसाठी, सेवेसाठी तत्पर असून महाराष्ट्रवादी व्हॉट्स्प हेल्पलाईनचा लाभ घ्या, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी माध्यामांशी संवाद साधताना तमाम ठाणेकर नागरिकांना केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्लभाई पटेल, महाराष्ट्र राज्याचे प्रदेश अध्यक्ष, खासदार सुनीलजी तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश यांनी, पक्षातर्फे नुकतीच 'महाराष्ट्रवादी व्हॉट्स्प हेल्पलाईन' सुरु केली आहे. हा व्हॉट्स्प नंबर आहे ९८६१ ७१७१७१. या नंबरवर राज्यातील सर्व शासकीय योजनांची माहिती या व्हॉट्स्प नंबरवर दिली जाईल. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महाराष्ट्र राज्याचा सन २०२४–२५ सालचा अर्थसंकल्प सादर करताना ज्या घोषणा जाहीर केल्या त्या संपूर्ण घोषणांची माहिती या एका फोननंबरवर मिळू शकते. या व्हॉट्स्प नंबरला 'कळ' टाईप केल्यानंतर लगेच आपली भाषा, जिल्हा, मतदार संघ, लिंग आदी माहिती आपल्याला फीड करायची आहे. ज्या योजनेची माहिती हवी असेल त्या योजनेचे नाव टाईप करायचे आहे. आपल्याला फक्त माहिती हवी असेल तर माहिती मिळेल, यापेक्षा अधिक काही माहिती हवी असेल तर



'मदत' हा पर्याय निवडायचा आहे. त्यानुसार पर्यायाची पुष्टी करण्यात येईल. आपली तक्रार ही सेंट्रलाईज कॉलसेंटरला सरळ जाते. या कॉलसेंटरच्या माध्यमातून ज्या माताभगिनींनी मुख्यमंत्री माझी लाडकी योजनेचा फॉर्म भरण्यासंदर्भात काही अडचण येत असेल, अशाप्रकारच्या तक्रारीचा व्हॉट्स्प या नंबरवर केला तर ती महिला जर ठाणे शहर जिल्यातील असेल तर जिल्हाध्यक्ष या नात्याने मला सेंट्रलाईज कॉल सेंटर मधून कळेल. १५ मिनिटात मेसेज येतो आणि मग आमचा राष्ट्रवादीचा स्थानिक कार्यकर्ता किंवा कार्वकर्ती त्या तक्रारदार महिलेला फॉर्म भरायला जर काही अडचण येत असेल तर ती अडचण आम्ही दूर करतो. अशाप्रकारे ज्या विविध योजना आहेत त्या योजनेची संपूर्ण माहिती या महाराष्ट्रवादी व्हॉट्स्प नंबर मध्ये दिलेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ठाणे शहर जिल्हय़च्या वतीने आमच्या भगिनी महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांनी पिंक रिक्षाची घोषणा या बजेटमध्ये केली होती, ठाणे शहरामधील एक हजार माता भगिनींना पिंक रिक्षाचे परमिट आणि रिक्षा घेण्यासाठी अनुदान हे महाराष्ट्र शासन देणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ठाणे मध्यवर्ती कार्यालयात संपर्क साधल्यास ठाण्यातील तमाम माताभगिनींना रिक्षाचे ट्रेनिंग, ड्रायव्हिंग लायसन्स ते रिक्षा घेण्यासाठीचा शासनाचा निधी मिळवून देणे यासाठी सर्वोतोपरी मदत केली जाईल. यासाठी महाराष्ट्रवादी व्हॉट्स्प हेल्पलाईन नंबर ९८६१ ७१७१७१ याचा जास्तीत जास्त लाभ ठाणेकरांनी घ्यावा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ठाणे शहर जिल्हा तमाम ठाणेकरांच्या मदतीसाठी व सेवेसाठी तत्पर व हजर आहे, अशी माहिती यावेळी प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी दिली.

## काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायत मधील नागरिकांच्या भ्रष्टाचाराच्या निवेदनावर जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अजब आदेश..

**नागरिकांचे मा.जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर..**

लातूर : – काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्तेच्या बेकायदेशीर नोंदी व विकास कामांमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून कार्यवाही करणे बाबत लातूर जिल्हा परिषदेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक २२/८/२४ रोजी निवेदन सादर करण्यात आले होते. परंतु सदर प्रकरणी मा.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत अतिशय चुकीचा व आश्चर्य व्यक्त करणारा आदेश काढण्यात आला आहे.




सदर प्रकरणी ज्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे त्यांनाच सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काढले आहेत.त्यांनी काढलेल्या आदेशाबद्दल नागरिकांकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे.

या विरोधात नागरिकांनी आता मा.जिल्हाधिकारी मॅडम यांच्या कडे निवेदन सादर केले आहे. सदर प्रकरणी आता जिल्हाधिकारी मॅडम यांनी सदर आदेश रद्द करुन दुसऱ्या अधिका–यांची चौकशी समिती नेमण्याचे आदेश संबंधितांना दिले आहेत. याबाबत आज काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायत मधील नागरिकांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती व या पत्रकार परिषदेत ग्रामस्थांनी आपली बाजू मांडली. सदर पत्रकार परिषदेस ड.किरण बडे, ड.प्रभाकर केदार, विष्णू शिंदे, महादेव जमादार, ड.सतिष धायगुडे, भास्कर लहाने, सदाशिव नागरगोजे, काळे साहेब, उदय गोजमगुंडे, आकाश जमादार, इरफान शेख, वसीम पठाण, प्रकाश शिंदे, माधव येनाकफळे आदींसह इतर नागरिक उपस्थित होते.

## मौजे वासनगाव येथे तंटामुक्ती गाव समितीचे अध्यक्ष भुजंग जाधव तर उपाध्यक्षपदी भागवत साळुंके यांची बिनविरोध निवड

लातूर :– वासनगाव येथे दि.२३/०८/२०२४ रोजी झालेल्या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष भुजंग जाधव तर उपाध्यक्षपदी भागवत साळुंके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्ष भुजंग माणिकराव जाधव उपाध्यक्ष भागवत निवृत्ती साळुंके यांची बिनविरोध निवड करण्यात आली या प्रसंगी ग्रामसभेचे अध्यक्ष गावचे कर्तव्यदक्ष लोकनियुक्त सरपंच श्री रमेश माधवराव थोरमोटे पाटील तसेच सचिव ग्रामसेवक बसर्गी साहेब व उपसरपंच लक्ष्मण मारुती मारडकर, ग्रामपंचायत सदस्य– श्री तुळशीराम काशिनाथ आलुरे, श्री रघुनाथ लक्ष्मण मस्के,श्री अमोल बालासाहेब डुरे, पोलीस पाटील– विठ्ठल फेसाटे आंगणवाडी सर्व कार्यकर्ती– मेकले रुक्मिणी साळुंखे कविता काळे पद्मिनी व मदतनीस– अडसुळे गौरा, रुक्मिणी फेसाटे ग्रामपंचायत कर्मचारी– गोविंद लोभे, नवनाथ रसाळ गोपाळ लोभे, अक्षय कदम तसेच गावातील नागरीक सिद्धेश्वर जाधव , गणपती कोंपले, भालचंद्र कोंपले, गोपाळ करे, व्यंकट घोडके, हरिदास गाटचिरले, रामेश्वर करे, अच्युत जाधव, दत्ता रसाळ, गायकवाड पंडित, आत्माराम बोकडे , नरसिंग नीलामे,



रामचंद्र जाधव अनेक नागरिक उपस्थित होते . ग्रामपंचायत वासनगाव सरपंच ,उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी तसेच उपस्थित नागरिक यांच्या वतीने नूतन तंटा मुक्ती अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे शाल, श्रीफळ, बुके व पुष्पहार देऊन अभिनंदन करण्यात आले.

## लाडक्या बहिणींच्या पैशावर बँकांचा डोळा



पुणे : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा तीन हजाराचा हप्ता महिलांच्या बँक खात्यावर जमा झाला असताना सरकारच्या या महत्वकांक्षी योजनेत काही बँका खिळ मारताना दिसत आहे. महिलांच्या खात्यात जमा झालेल्या रक्कमेतून बँका मिनिमम बॅलन्स चार्ज, एसएमएस चार्ज, थकीत कर्ज वसुली या नावाखाली परस्पर रक्कम कपात करून घेत आहे. त्यामुळे महिलांना मिळालेल्या तीन हजार रुपयातून अवघे हजार अकराशे रुपयेच हातात मिळत असल्याने महिलांमधून बँकांच्या धोरणाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

अनेक महिलांची विवाहाच्या अगोदर माहेरी बँकामध्ये असलेल्या खात्यावर विवाहानंतर व्यवहार झाले नाही. परंतु ते खाते आधार लिंक असल्याने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पैसे पूर्वीच्याच बँक खात्यात जमा झाले आहे. तर ग्रामीण भागात जनधन योजनेसाठी किंवा गॅस अनुदानासाठी अनेक महिलांनी बँकेत खाते उघडले. परंतु, अनेक वर्ष त्या खात्यात व्यवहार झाले नसल्याने काहींच्या खात्यामध्ये पैसेच शिल्लक नाही. परंतु ते खाते आधारला लिंक असल्याने अनेक महिलांचे पैसे त्या खात्यात जमा झाले. जुलै व ऑगस्ट या दोन महिन्याचे एकूण तीन हजारांचा हप्ता कागदपत्रांची पूर्तता केलेल्या महिलांच्या बँक खात्यावर जमा झाला आहे. या योजनेमुळे महिला आनंदित झाल्या आहेत.

महिला बँकेत पैसे काढण्यासाठी गेल्या असता त्यांच्या खात्यातून काही बँकांनी मिनिमम बॅलन्स चार्ज, एसएमएस चार्ज, थकीत कर्ज वसुली या नावाखाली परस्पर रक्कम कपात करून घेतली आहे. त्यामुळे कपात करून काही महिलांच्या खात्यात तीन हजार पैकी अवघे हजार अकराशे रुपयेच शिल्लक राहिले आहे. तर काही महिलांच्या खात्यात जमा झालेली सर्वच्या सर्व तीन हजार रुपये रक्कम कपात झाली असल्याने महिलांच्या आनंदावर विरजण पडले आहे. काही बँक व्यवस्थापकांशी संपर्क केला असता ते सांगतात तो बँकेचा नियम आहे. बँकांच्या सॉफ्टवेअर मध्ये सिस्टीम असल्याने आपोआप पैसे कपात होत असल्याने आमचा नाईलाज असल्याचे सांगत आहे.

शासकीय योजनेअंतर्गत आलेल्या रक्कमेतून बँकांनी खातेदाराच्या परस्पर कपात करू नये याबाबत राज्य शासनाने बँकांना निर्देश द्यावे, अशी मागणी लोणीचे सरपंच सावळेराम नाईक, धामणीच्या सरपंच रेश्मा अजित बो–हाडे, पारगावच्या सरपंच श्वेता किरण ढोबळे व पोंदेवाडीच्या सरपंच नीलम अनिल वाळुंज यांनी केली आहे.

## उदगीरमध्ये ४ सप्टेंबर रोजी महिलांचा आनंद सोहळा; लातूर जिल्हा प्रशासनामार्फत जय्यत तयारी सुरु !

**बुध्द विहार उद्घाटनालाही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची उपस्थिती**
उदगीर येथे उभारण्यात आलेल्या बुद्ध विहाराचे उद्घाटन ४ सप्टेंबर रोजी होत आहे. या कार्यक्रमालाही भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत. उदगीर शहरातील तळवेस येथे बुध्द विहाराचे बांधकाम करण्यात आले आहे. हे बुद्ध विहार कर्नाटकातील कलबुर्गी येथील बुध्द विहाराची प्रतिकृती आहे.





लातूर :– महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीसाठी चालना देणे, महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवणे, यासाठी विविध शासकीय योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांचा लाभ मिळालेल्या महिलांचा आनंद सोहळा ४ सप्टेंबर रोजी उदगीर शहरातील महाराष्ट्र उदयगिरी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी प्रशासनाकडून सुरु आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार आहे.यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी जिल्हा प्रशासनामार्फत विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या महिलांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्याकडून याबाबत सातत्याने आढावा घेण्यात येत आहे. वाहतूक, बैठक व्यवस्थेसह सर्व आवश्यक बाबींकरिता नेमण्यात आलेल्या पथकांकडून पूर्वतयारी वेगाने सुरु आहे.कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देणारी दालने उभारण्यात येणार आहेत. यामुळे महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती एकाच छताखाली मिळण्यास मदत होईल. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महिला सन्मान योजना यासारख्या विविध योजनांमधून महिलांच्या स्वप्नांना बळ देवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांना मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्न करीत आहे.

## बालरंगभूमी परिषद देणार बालकांना हक्काचा रंगमंच निलम शिर्के–सामंत

लातूर:– बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्यावतीने जल्लोष लोककलेचा या बालकांसाठीचा दोन दिवसीय लोककला महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. याचे उद्घाटन ३१ ऑगस्ट रोजी बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या अध्यक्षा व सिने अभिनेत्री निलम शिर्के – सामंत यांच्या हस्ते झाले. दगडोजीराव देशमुख सभागृहात झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे, परिषदेचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष ड. शैलेश गोजमगुंडे, सहकार्यवाह असिफ अन्सारी, रंगकर्मी बाळकृष्ण धायगुडे, डॉ. दिपक वेदपाठक, संतोष कुलकर्णी, भारत थोरात आदी उपस्थित होते.

अलीकडेच महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या निलम शिर्के याप्रसंगी बोलताना म्हणाल्या की, महाराष्ट्रातल्या नाट्य, नृत्य, संगीत, चित्र आदी कलाप्रकारात नैपुण्य मिळवणाऱ्या तसेच मिळवू इच्छिणाऱ्या बालकांना आपले कलागुण सिद्ध करण्यासाठी बालरंगभूमी महाराष्ट्रात हक्काचा मंच उपलब्ध करुन दिला जाईल. लातूरच्या बाल कलाकारांचे कलाविष्कार बघून त्यांनी इथल्या मुलांना रत्नागिरी येथील १०० व्या नाट्य संमेलनात संधी देणार असल्याचे सूतोवाच केले. तर






जिल्हाधिकाऱ्यांनी बालकांचे कौतुक करताना सांगितले की, शिक्षण आणि संस्कृती संपन्न असलेल्या लातूरची मी जिल्हाधिकारी असल्याचा मला अभिमान वाटतो.

दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात समूह लोकनृत्य, एकल लोकनृत्य, समूह लोकगीत, एकल लोकगीत एकल लोकवाद्य या पाच कलाप्रकारांचे सादरीकरण होणार असून यात लातूर जिल्ह्यातील ७५६ बालकलाकार सहभागी होत आहेत. कलाकारांना प्रोत्साहनपर पारितोषिके व सहभाग परमनप्र देण्यात येणार आहे.

हा महोत्सव यशस्वी होण्यासाठी बालरंगभूमी परिषद लातूर शाखेचे सुमती सोमवंशी, मयूर राजापूरे, हिरा वेदपाठक, सुवर्णा बुरांडे, प्रा. नवलाजी जाधव, रवी अघाव, रणजीत आचार्य, ड. बालाजी म्हेत्रे, वनिता गोजमगुंडे, सलीम पठाण, रविकिरण सावंत, महेश पवार, प्रिती ठाकूर, तन्मय रोडगे, विश्वजीत पांचाळ, विशाल वाटवडे, महेश बिडवे, ऋतुराज सुरवसे, आकाश कुलकर्णी, दुनगावे सर, अभिजीत भड, अभिषेक शिंदे आदी परिषदेचे पदाधिकारी व सदस्य मेहनत घेत आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE